ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 5434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख ७ सप्टेंबर, १९५५ | अंक ३६

## विविध माहिती

**मद्रास सरकारला कर्ज**—भारतीय सरकारनें मद्रास सरकारला अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेस आर्थिक मदत देण्याचें ठरविलें आहे. राज्य-सरकारला १,५३,८७,००० रुपये कर्ज म्हणून आणि ४,६२,००० रुपये मदत म्हणून देण्यांत येणार आहेत. मदत म्हणून देण्यांत येणाऱ्या रकमेपैकीं कांहीं भाग मच्छीमारीच्या प्रगतीसाठी व सुधारलेल्या भाताचें बीं वांटण्यासाठीं खर्च करण्यांत येईल.

**भारताला ऑस्ट्रेलिआची मदत**—निरक्षरता नाहींशी करण्याच्या भारताच्या प्रयत्नांस ऑस्ट्रेलिआ कोलंबो योजनेप्रमाणें साह्य देणार आहे. निरक्षरता नाहींशी करण्याच्या कामीं ध्वनींचा व दृश्यांचा कसा उपयोग करावा, हें दाखवून देणारे दोन ऑस्ट्रेलिअन तज्ज्ञ भारतांत येणार आहेत.

**सुगंध तयार करण्याचा कारखाना**—त्रावणकोर-कोचीन राज्य सरकारनें राज्यांतील लेमन ग्रासचा उपयोग करून सुगंध तयार करण्याचा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. राज्यांत ३६,३५० एकरांत लेमन ग्रासची लागवड करण्यांत येते व तें सर्व अमेरिकेला निर्यात करण्यांत येतें. अमेरिका व इतर देशांत त्याच्यापासून सुगंध तयार करण्यांत येतात.

**पाँदीचरीच्या मंत्र्यांचे पगार**—भारतांत विलीन झालेल्या पाँदीचरी ह्या फ्रेंच वसाहतीच्या मंत्रिमंडळांत ६ मंत्री आहेत. त्यांनीं दरमहा ५०० रु. पगार घेण्याचें ठरविलें आहे. त्याशिवाय घरभत्ता व प्रवासभत्ता म्हणून दरमहा २०० रुपये त्यांना मिळतील.

**अणुशक्तिविषयक भारतीय संशोधन**—जिनीव्हा येथें भरलेल्या अणुशास्त्रविषयक परिषदेला हजर राहिलेल्या एका भारतीय सदस्यानें अशी माहिती सांगितली कीं, अणुशक्तीच्या शांततामय उपयोगाच्या बाबतींत भारत बऱ्याच पश्चिम युरोपिअन राष्ट्रांच्याहि पुढें असून पांच वर्षांच्या अवधींत तो फ्रान्सइतकी मजल मारील. रशिआ व अमेरिका ह्या दोन राष्ट्रांत अणुसंशोधनाबाबत फारच थोडा फरक आहे, असेंहि मत त्यानें व्यक्त केलें.

**भावनगरचें रेल्वे-स्टेशन**—भावनगरचें रेल्वे-स्टेशन सुधारण्याचें रेल्वेनें ठरविलें आहे. सध्यांच्या रेल्वे-स्टेशनाच्या मागें रेल्वे-वहातुकीला लागणाऱ्या कांहीं इमारतीहि बांधण्यांत येणार आहेत. त्याचप्रमाणें डबे, तयार करण्याचा छोटा कारखानाहि उभारण्यांत यावयाचा आहे.

**सहकारी संस्थांना काम**—ग्रामीण भागांतील सहकारी संस्थांना एजंट म्हणून नेमून त्यांच्या द्वारां नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेटस् आणि नॅशनल प्लॅन सर्टिफिकेट्स ह्यांची विक्री करण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे, असें समजतें.

**अमेरिकन बोलपट दाखविला नाहीं**—व्हिएन्ना येथें आंतरराष्ट्रीय बोलपटांचा महोत्सव साजरा करण्यांत आला. ह्या महोत्सवांत दाखविण्यांत येणाऱ्या अमेरिकन बोलपटांत 'ब्लॅक बोर्ड जंगल' ह्या नांवाचा एक चित्रपट होता. पण इटलींतील अमेरिकन वकीलाच्या सूचनेवरून तो दाखविण्यांत आला नाहीं. बोलपटांत अमेरिकेंतील एका शाळेमधील बालगुन्हेगारी दाखविण्यांत आली होती.

**कत्तलखान्यांची सुधारणा**—मुंबई सरकारनें राज्यांतील कत्तलखान्यांची सुधारणा करण्यासाठीं आणि नवीन कत्तलखाने बांधण्यासाठीं म्युनिसिपालिट्यांना आर्थिक मदत देण्याचें ठरविलें आहे. ह्यासंबंधीं नेमण्यांत आलेल्या चौकशी-कमिटीच्या शिफारसीप्रमाणें ही मदत देण्यांत येत आहे. कामासाठीं लागणाऱ्या खर्चापैकीं २० ते २५ टक्के रक्कम सरकार देईल.

**रशिआ पोलाद देणार**—रशिआ भारताला ५०,००० टन पोलाद पुरविणार आहे. त्यापैकीं २०,००० टन चालू वर्ष संपण्यापूर्वी व बाकीचें पुढील वर्षाच्या पहिल्या तिमाहींत पुरविण्यांत येईल. भारतानें आतांपर्यंत १२,००० टन रशिअन पोलाद चालू वर्षी घेतलें आहे. पोलादाची किंमत सुमारें २॥ कोटी रुपये आहे.

**जपानी शास्त्रज्ञांचा शोध**—सूर्याच्या किरणांचा उपयोग करून धातू वितळण्याइतकी उष्णता निर्माण करणारी सूर्यभट्टी जपानी शास्त्रज्ञांनीं तयार केली आहे. ह्या भट्टींत अल्युमिनयमच्या आरशांचा उपयोग करण्यांत आला आहे. भट्टींत २,१०० सेंटिग्रेड उष्णता निर्माण होऊं शकते.

**खांडवा-हिंगोली रेल्वे रस्ता**—खांडवा-हिंगोली रेल्वे-रस्त्याच्या पहाणीचें काम पावसाळा संपल्यानंतर जोरानें हातीं घेण्यांत येणार आहे. ह्या कामासाठीं १५० लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. १८० रेल्वे एंजिनिअर्स हें काम करणार आहेत.

**सिंद्री खत कारखान्याचा नफा**—सिंद्री येथें काढण्यांत आलेल्या सरकारी मालकीचा खतकारखाना कसा काय चालेल ह्याविषयीं शंका प्रदर्शित करण्यांत येत असे. परंतु लोकसभेंत अर्थमंत्र्यांनीं सांगितलेल्या माहितीप्रमाणें, चालू वर्षी कारखान्याला १ कोटी रुपये नफा होईल.

**भारतासाठीं इलेक्ट्रॉनिक ब्रेन**—कलकत्ता येथील इंडिअन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूटच्या उपयोगासाठीं ब्रिटिश कंपनीनें बनविलेलें इलेक्ट्रॉनिक ब्रेनचें मशीन आयात करण्यांत येणार आहे. ह्या यंत्रासाठीं २,५०,००० रुपये यावे लागतील. त्याची जुळणी भारतांतच करण्यांत येणार आहे.

### सेंट्रल बँकेचे श्री. कॅप्टन ह्यांचा मृत्यु

बुधवार, दि. ३१ ऑगस्ट रोजीं सेंट्रल बँक ऑफ इंडिआच्या मॅनेजिंग डायरेक्टरचे जागेवरून प्रकृतीचे कारणास्तव निवृत्त झालेले, श्री. एच्. सी. कॅप्टन, हे रविवार दि. ४ सप्टेंबर रोजीं त्यांच्या रहात्या घरीं मुंबई येथें वयाच्या ६७ व्या वर्षी हृदय-विकारानें मृत्यु पावले. १९१७ मध्यें ते सॉलिसिटरच्या परीक्षेंत पहिले आले व कांहीं वर्षे त्यांनीं सॉलिसिटरचा धंदा केला. १९२१ मध्यें त्यांनीं सेंट्रल बँकेंत सेक्रेटरी ह्या नात्यानें प्रवेश केला. १९३७ मध्यें ते मॅनेजर झाले. गेलीं १२ वर्षे ते मॅनेजिंग डायरेक्टर होते.

### बिलमार्केट योजना

१९५२ मध्यें सुरू केलेल्या बिलमार्केट योजनेचा फायदा अधि-काधिक बँका घेऊं लागल्या आहेत. पूर्वी किमान कर्जाची मर्यादा २५ लक्ष रु. होती, ती नंतर १० लक्ष रु. करण्यांत आली. मध्यवर्ती सहकारी बँकांना मात्र ह्या योजनेंत स्थान नाहीं.

### २० नवे सहकारी कारखाने

मुंबई राज्यांत सहकारी तत्त्वावर २० नवे साखरकारखाने १९६१ अखेर उभारले जाण्याचा संभव आहे. आतांपर्यंत १३ कारखान्यांना भारत सरकारचा परवाना मिळालेला आहे.

### स्टेट बँकेकडील ठेवी

" इंपीरिअल बँकेचें स्टेट बँक ऑफ इंडियांत रूपांतर झाल्या-मुळें तिचेकडील ठेवींत कांहींहि फरक पडलेला नाहीं. मोसमी किंवा इतर कारणांमुळें थोडा फरक पडला असणें अशक्य नाहीं." असें लोकसभेंत सांगण्यांत आलें.

### दशमान पद्धतीचीं नाणीं

भारतांत ऑक्टोबर, १९५६ मध्यें दशमान पद्धतीचीं नाणीं सुरू होतील. त्यानंतर सुमारें चार वर्षे जुनीं नाणींहि चालूं रहातील. सर्वांत लहान नाण्याचें नांव " नया पैसा " असें ठेवलें जाईल. २ पैसे, ५ पैसे व १० पैसे ह्या नाण्यांचीं नांवें अद्याप ठरविण्यांत आलेलीं नाहींत. जगांतील सुमारें ५० देशांत अशीं नाणीं चालूं आहेत व जागतिक लोकसंख्येपैकी तीनचतुर्थांश लोकसंख्या त्यांचा वापर करीत आहे.

### लंडन-सिंगापूर मोटारनें प्रवास

ऑक्सफर्ड विद्यापीठाचे तीन व केंब्रिज विद्यापीठाचे तीन असे सहा विद्यार्थी १ सप्टेंबर रोजीं मोटारनें इंग्लंडहून सिंगापूरला जाण्यास निघाले. ब्रह्मदेश व पाकिस्तान ह्यांतील कालव्यांच्या पाणीपुरवठ्याची पहाणी ते करणार आहेत.

### सें. को. बँकेचें संचालक मंडळ

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालक मंडळाची निवड-णूक रविवारीं होऊन व्यक्तिशः सभासदांतर्फे खालील उमेदवार निवडून आले :

( १ ) श्री. वा. व. गोगटे, ( २ ) श्री. ना. वि. पांडव ( ३ ) श्री. वि. त्र्यं. टिळक ( ४ ) श्री. वि. क. तुळशीबागवाले ( ५ ) श्री. रा. य. बोरकर ( ६ ) श्री. द. दि. चितळे, ( ७ ) श्री. र. वा. जोशी.

अध्यक्षपदीं श्री. भिकू सखाराम तावरे व उपाध्यक्षपदीं शिवाजी महादेव काळे यांची निवड झाली.

**फ्रान्सची मदतीची तयारी**—फ्रेंच पोलादाच्या कारखान-दारांनीं भारताला आणखी एक पोलादाचा कारखाना उभारण्यासाठी मदत करण्याची तयारी दाखविली आहे. जर्मनी, ब्रिटन आणि रशिआ ह्यांच्यातर्फे भारतांत उभारण्यांत यावयाच्या पोलादाच्या कारखान्याला लागणारे तंत्रज्ञच भारतांत जेमतेम आहेत. अशा परिस्थितींत नव्या संभाव्य कारखान्याला त्यांची वाण भासण्याची शक्यता आहे.

## सातारा जिल्हा को-ऑ. लँडमॉर्गेज बँक लि. कराड-सांगली

### फक्त सभासदांकरितां वार्षिक सभेची नोटीस

सातारा जिल्हा को. ऑ. लँडमॉर्गेज बँक लि. कराड-सांगलीची २० वी वार्षिक साधारण सभा रविवार ता. २५ सप्टेंबर १९५५ रोजीं दुपारीं ३ वाजतां कराड येथील बँकेचे ऑफिसमध्यें भरणार आहे. त्यावेळीं सभेंत खालीलप्रमाणें कामें होतील:—

मागील सभेचें प्रोसिडिंग वाचणें, ५४-५५ चा अहवाल, ताळेबंद व नफातोटापत्रक मंजूर करणें, सन १९५५-५६ करितां अंदाजपत्रक तयार करणें, इत्यादि कामें होणार आहेत तरी अ वर्ग कर्जदार व बिगर कर्जदार सभासदांनीं सभेस अगत्य यावें अशी विनंति आहे. कळावे.

कराड
ता. २९-८-५५

नीलकंठराव आण्णाप्पा कल्याणी,
चेअरमन


**पुण्याचें स्वागत लॉज**

पुण्याच्या " स्वागत लॉज "चे पाहुणे, म्हणजे चांगल्या गोष्टींचे पुरस्कर्ते असल्याची १०० टक्के खात्री !

स्वागत लॉजिंग-बोर्डिंग, डेक्कन जिमखाना, फोन ४०६०

**'अर्थ' ग्रन्थमाला**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



# अर्थ

बुधवार, ता. ७ सप्टेंबर, १९५५





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## बड्या बँकांतील वरिष्ठ नौकरवर्गाचे पगार

### कपातीचा संभव

आवडी काँग्रेसनें भारतांत समाजवादी पद्धतीची समाजरचना स्थापन करण्याचें ध्येय मान्य केलें आहे. ह्या पद्धतीच्या समाजव्यवस्थेचीं प्रधान लक्षणें कोणतीं, ह्यासंबंधीं तज्ज्ञांतहि मतभेद असले तरी देशांतील नागरिकांच्या प्राप्तींत आत्यंतिक विषमता असूं नये हें एक लक्षण सर्वच मान्य करतात. औद्योगिक दृष्ट्या प्रगत असलेल्या देशांतील नागरिकांच्या प्राप्तींत असलेली तफावत आणि भारतासारख्या अविकसित देशांतील नागरिकांच्या प्राप्तींत असलेली तफावत ह्या दोन्ही एकाच मापानें मोजतां येणार नाहींत, हें खरें असलें तरी मागासलेल्या देशांतील तफावत औद्योगिक विकासाला जाचूं शकते, हीहि गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे.

"बँकिंग कंपन्यांच्या कायद्यांतील एका तरतुदीप्रमाणें, मॅनेजिंग डायरेक्टरांना द्यावयाच्या वेतनास रिझर्व्ह बँकेची मंजुरी लागते. बँकिंग क्षेत्रांतील इतर ठिकाणच्या वेतनाशीं त्याची तुलना व्हावी, एवढीच तेथें मर्यादित अपेक्षा आहे. परंतु, बँकिंग क्षेत्रांतील उच्च पदाधिकाऱ्यांचें वेतनच मुळीं इतर क्षेत्रांतील तत्सम वेतनाचे मानानें अधिक आहे. न्या. गजेंद्रगडकरांनीं सुचित केल्याप्रमाणें, सरकारला त्या संबंधांत कांहींतरी करावें लागेल." अर्थमंत्री, श्री. देशमुख, ह्यांनीं लोकसभेंत कंपनी बिलावरील चर्चेचे वेळीं वरीलप्रमाणें विधान केलें, ते प्रसंगोचित असेंच आहे.

गजेंद्रगडकर बँक अवार्ड कमिशननें बँकांतील वरिष्ठ नौकरवर्गाच्या पगारांबाबत काय भूमिका घेतली आहे, त्यास त्यामुळें महत्त्व प्राप्त झालें आहे. प्रथम ह्या विषयासंबंधीं कमिशनच्या अहवालांत देण्यांत आलेली माहिती थोडक्यांत अवलोकन करावी लागेल. अपेलेट ट्रायब्यूनलच्या अवार्डमध्यें भारतीय सरकारनें बदल केल्यावर ह्या विषयासंबंधीं राज्य सभेंत बरीच गरम चर्चा झाली होती. त्यावेळीं, म्हणजे ३ सप्टेंबर १९५४ ह्या दिवशीं, राज्यसभेंत बोलतांना पं. नेहरू ह्यांनीं, कोणत्याहि कामासाठीं भरमसाट फुगलेले पगार देण्यास आपला विरोध आहे असें सांगितलें होतें. राज्यसभेंतील कम्युनिस्ट गटाचे पुढारी श्री. सुंदरय्या ह्यांनीं बँकेंतील सामान्य कारकुनांना मिळणाऱ्या वेतनाच्या पातळीची वरिष्ठ नौकरवर्गाला मिळणाऱ्या पगाराच्या पातळीशीं तुलना करून अशी माहिती सांगितली होती कीं, एका प्रमुख बँकेच्या मॅनेजिंग डायरेक्टरला दरमहा करमाफ ७,५०० रुपये पगार देण्यांत येतो.

कमिशननें बँकांकडून त्यांच्या पहिल्या पांच वरिष्ठ नौकरांना देण्यांत येणाऱ्या पगाराची व इतर सोयी-सवलतींची तपशीलवार माहिती मागविली होती. ह्या माहितीच्या आधारानें कमिशननें पुढीलप्रमाणें चित्र रेखाटलें आहे. वरिष्ठ नौकरांना पगार, महागाई-भत्ता, स्थानिक भत्ता, बोनस आणि प्रॉव्हिडंट फंड अगर पेन्शन फंड ह्यांच्यासाठीं द्यावयाची रक्कम, हीं तर देण्यांत येतातच. पण त्याशिवाय इतरहि कांहीं भत्ते अगर सवलती देण्यांत येतात. त्यापैकीं कांहीं बाबी अशा आहेत. अगदी वरच्या श्रेणीच्या ह्या नोकरांना घरभाडें भत्ता देण्यांत येतो, अगर सामानसुमानासह किंवा त्याशिवाय रहाती जागाच मोफत देण्यांत येते. मोटार भत्ता देण्यांत येतो अगर बँकेच्या मोटारीचा वापर मोफत करण्याची सवलत मिळते. कधीं कधीं त्यांना मनोविनोदनासाठीं भत्ता देण्यांत येतो. क्लबांत जाण्याचा भत्ताहि देण्यांत येतो, अथवा त्यांचा ह्या बाबतींत जो खर्च होईल त्याचीं बिलें बँकेकडून भागविलीं जातात. कांहीं कांहीं ठिकाणीं त्यांच्या पगारांतून जो प्राप्तीवरील कर कापून घेण्यांत येतो, तो त्यांना परत करण्यांत येतो. अ वर्गांतील परदेशी बँका विलायतेहून आणलेल्या आपल्या वरिष्ठ नौकरांना ओव्हरसीज अलौअन्स, विवाह-भत्ता, कुटुंबभत्ता व मुलांसाठीं भत्ता देतात. ह्यापैकीं कांहीं बँकांच्या ब्रँच मॅनेजरांना त्यांच्याजवळ असणाऱ्या खाजगी नौकरांच्या पगारासाठीं भत्ता दिला जातो अथवा त्यांच्याजवळ असलेल्या नौकरांपैकीं कांहीं ठराविक नौकरांचा पगार बँकांकडूनच देण्यांत येतो. हे नौकर बहुधा मोफत दिलेल्या रहात्या जागेलाच जोडलेले असतात. भारतामधील एका प्रमुख बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याला ही सवलत देण्यांत येत आहे. प्रत्येक वर्गांतील बँकेंत काम करणाऱ्या पहिल्या पांच वरिष्ठ नौकरांना मिळणाऱ्या वार्षिक प्राप्तीची सरासरी त्याचप्रमाणें उरलेल्या वरिष्ठ नौकरांना मिळणाऱ्या वार्षिक प्राप्तीची सरासरी आणि बँकांतील कारकुनांना मिळणाऱ्या वार्षिक प्राप्तीची सरासरी ह्यांचें तुलनात्मक कोष्टकहि कमिशननें तयार केलें आहे. ह्या कोष्टकाच्या आधारानें कमिशननें पुढील निष्कर्ष काढले आहेत :—

(१) अ वर्गांतील भारतीय व परदेशी बँकांतून काम करणाऱ्या पहिल्या पांच वरिष्ठ अधिकाऱ्यांची वार्षिक प्राप्तीची सरासरी सर्वांत जास्त, म्हणजे दरसाल दर वरिष्ठ अधिकाऱ्यामागें ६८,००० रुपये इतकी आहे. ब वर्गांतील वरिष्ठ नौकरांच्या प्राप्तीच्या सरासरीपेक्षा ती तिप्पटीहून ज्यास्त आहे. ब वर्गांतील पहिल्या पांच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या प्राप्तीची वार्षिक सरासरी २२,००० रुपये आहे. (२) एक अ वर्गांतील भारतीय बँक आपल्या पांच वरिष्ठ नौकरांना सालीना १,३२,००० रुपये देते. ह्याच वर्गांतील दुसरी एक बँक आपल्या पांच वरिष्ठ नौकरांना सालीना ७०,००० रुपये देते. ह्या वर्गांतील कोठल्याहि बँकेच्या प्रमुखाला कमींत कमी ४६,००० रुपयांची वार्षिक प्राप्ति आहे. (३) अ वर्गांतील पहिल्या पांच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या प्राप्तीची वार्षिक सरासरी उरलेल्या दुय्यम अधिकाऱ्यांच्या सरासरीपेक्षा ११ पट अधिक आहे आणि इतर सामान्य नोकरांच्या प्राप्तीच्या सरासरीपेक्षा सुमारें ३८ पट अधिक आहे. (४) अ वर्गांतील भारतीय बँकांच्या पहिल्या पांच अधिकाऱ्यांच्या प्राप्तीची दर अधिकाऱ्यामागें वार्षिक सरासरी १,३२,००० रुपये आहे. ही सरासरी उरलेल्या दुय्यम अधिकाऱ्यांच्या

प्राप्तीच्या सरासरीपेक्षा १५ पट अधिक आणि इतर नौकर-वर्गाच्या प्राप्तीच्या सरासरीपेक्षा ६३ पट अधिक आहे. (५) ७०,००० रुपये वार्षिक सरासरी प्राप्ति असणाऱ्या पहिल्या पांच नौकरांशीं तुलना केली तर त्यांची प्राप्ति उरलेल्या दुय्यम दर्जाच्या अधिकाऱ्यांपेक्षा ८ पट अधिक आहे, आणि इतर कारकुनांच्या सरासरीपेक्षा ३३ पट अधिक आहे असें दिसून येतें. (६) अ आणि ब वर्गांतील बँकांच्या पहिल्या पांच वरिष्ठ नौकरांना जी एकूण प्राप्ति होते, त्यापैकीं अ वर्गातील बँकेच्या पहिल्या वरिष्ठ नौकराला ३८·७३ टक्के इतकी वार्षिक सरासरी प्राप्ति होते आणि ब वर्गातील पहिल्या वरिष्ठ नौकराला ३४·७६ टक्के इतकी वार्षिक सरासरी प्राप्ति होते.

कमिशननें आपल्या अहवालांत असें म्हटलें आहे कीं अ वर्गाच्या बँकांच्या पहिल्या पांच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या प्राप्तींत कपात केली तरी त्या बँकांच्या मोठ्या खर्चात फारशी बचत होणार नाहीं. पण अशी कपात करण्यांत आली तर त्याचा मानसिक परिणाम फार मोलाचा होईल. शिवाय दुसरें असें कीं, बँका ह्या समाजाच्या मालकीच्या रोखीच्या रखवालदार आहेत. म्हणून व्यवस्थापकीय खर्चांत काटकसर करणें हें त्यांचें कर्तव्यच आहे. बँकिंगच्या व्यवसायांत पहिल्या दर्जाच्या बुद्धिमान् माणसांचें दुर्भिक्ष आहे अशी वस्तुस्थिति नाहीं. अर्थातच अशा माणसांना दुष्काळी भाव देण्यांत येण्याचें कारण नाहीं. १९४९ च्या बँकिंग कंपनीज ॲक्ट मधील १० व्या कलमाकडे कमिशननें लक्ष वेधलें आहे. बँकिंगच्या व्यवसायांतील सर्वसामान्य संकेत लक्षांत घेतां, एखाद्या नौकराचें वेतन जर बँकेच्या परिस्थितीशीं जुळणारें नसेल तर अशा नौकराला कामावर ठेवण्याची बंदी वरील कलमांत करण्यांत आली आहे. ह्या बाबतींतील अधिकार रिझर्व्ह बँकेकडे आहेत. ज्या बँकांतील वरिष्ठ नौकरांचे पगार बँकेच्या धंद्यांतील स्थानाशीं जुळते नसतील त्यांच्या बाबतींत तर ही बंदी लागू करावीच; पण ज्या बँकांतील वरिष्ठांचे पगार बँकेंतील इतर नौकरांच्या पगाराच्या मानानें भलतेच अधिक असतील त्यांनाहि बंदी लागू करण्यांत यावी. प्रमुख भारतीय बँकांमधील वरिष्ठ नौकरांचे पगार सरकारी नियंत्रणाखालीं असावे, त्याचप्रमाणें करमाफ पगार देण्याचेंहि बंद करण्यांत यावें, अशा शिफारसी कमिशननें केल्या आहेत.

**ब्रिटिश तज्ज्ञांना पाचारण**—भारतांत काढण्यांत याव-याच्या तिसऱ्या पोलादाच्या कारखान्याविषयीं विचारविनिमय करण्यासाठीं सरकारनें ब्रिटिश पोलाद कंपन्यांच्या तज्ज्ञांना पाचारण केलें आहे. संकल्पित कारखान्यांत १० लाख टन पोलाद निर्माण करण्यांत येणार आहे. पोलादाशिवाय दरसाल ५०,००० टन बिडाचें लोखंडहि निर्माण करण्यांत येईल.

**युगोस्लाव्हिआनें दिलेल्या भेटी**—पं. नेहरू युगोस्लाव्हिआंत दौऱ्यावर गेले असतां त्यांना अनेक भेटी मिळाल्या होत्या. सर्व वस्तूंचें मिळून वजन ४॥ टन आहे. त्या घेऊन युगोस्लाव्हिआची एक छोटी बोट भारतांत आली आहे. त्याशिवाय भारतीय औद्योगिक प्रदर्शनांत मांडण्यासाठीं पूर्व-युरोपांतील देशांमधून कांहीं यंत्रसामुग्रीहि आणण्यांत आली आहे.

**व्हिएन्ना येथील डॉक्टरांचा संप**—व्हिएन्नांतील व ऑस्ट्रिआंतील सुमारें १३,००० डॉक्टर्स आणि २,००० दंतवैद्य ह्यांनीं दोन दिवसांचा संप केला होता. सरकारनें संकल्पित आरोग्य विमा-योजनेबाबत आपला सल्ला घेतला नाहीं अशी त्यांची तक्रार होती.

सेवा, सुरक्षा आणि सौजन्याचें प्रतीक
स्थापना १९१८
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक
लिमिटेड.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई
अधिकृत भांडवल रु. १०,००,०००
वसूल झालेलें भांडवल रु. ७,३६,०००
रिझर्व रु. ६,४६,०००
ठेवी रु. १,३७,००,०००
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.
★ शाखा:- दादर, माहीम, बेळगांव, पुणें ★
हमाम स्ट्रीट येथें बँकेची फोर्ट शाखा २३ जूनपासून चालू झाली आहे.

## सहकारी विमा परिषद

दिल्ली येथें ऑल इंडिआ कोऑपरेटिव्ह इन्शुरन्स परिषदेचें पहिलें अधिवेशन गेल्या महिना अखेर भरलें होतें. १९५५ च्या फिनॅन्स ॲक्टनें, कोऑपरेटिव्ह इन्शुरन्स कंपन्यांना प्राप्तीवरील कराबाबत ज्या सवलती देण्यांत आल्या होत्या त्या काढून घेतलेल्या आहेत. सदर सवलती ह्या कंपन्यांना परत देण्यांत याव्या अशी मागणी परिषदेंत मंजूर झालेल्या एका ठरावान्वयें करण्यांत आली आहे. ठरावामध्यें करचौकशी समितीचा उल्लेख करून समितीनें केलेल्या शिफारसीप्रमाणें सवलती काढून घेण्यांत आल्या असाव्या असा तर्क करण्यांत आला आहे. करचौकशी समितीच्या शिफारसीविषयीं ठरावांत असें म्हणण्यांत आलें आहे कीं, त्या वस्तुस्थितीचें पुरेसें आकलन न झाल्यामुळें करण्यांत आल्या आहेत. भारतामधील कोऑपरेटिव्ह इन्शुरन्सच्या धंद्याचें भवितव्य ज्या प्रश्नाशीं निगडित आहे अशा प्रश्नांबद्दल आपली बाजू मांडण्याची संधीहि त्यांना देण्यांत आलेली नाहीं. सध्या विम्याच्या धंद्यांत जॉइंट स्टॉक कंपन्यांची जोराची स्पर्धा चालू आहे. ह्या कंपन्यांशीं यशस्वीपणें टक्कर देण्यासाठीं कोऑपरेटिव्ह कंपन्यांना साह्य होणें जरूर आहे. परिषदेंत पास झालेल्या दुसऱ्या ठरावाप्रमाणें, विम्याच्या कायद्यांत दुरुस्ती करण्यांत यावी असें सुचविण्यांत आलें आहे. कोऑपरेटिव्ह इन्शुरन्स कंपन्यांना परवाने घेऊन इतर कोऑपरेटिव्ह इन्शुरन्सचें काम करतां यावें म्हणून कायद्यांत दुरुस्तीची मागणी करण्यांत आली आहे.

---


## बँकरचें औदार्य

एका बँकिंग असोसिएशनचे अध्यक्ष बँकर्सच्या मोठ्या सभेंत भाषण करीत होते. भाषण चालू असतांच ध्वनिक्षेपक बंद पडला, तेव्हां त्यांनीं आपला आवाज मोठा करून, पाठीमागच्या रांकेंतील एकाला 'ऐकूं येतें का?' असें विचारलें. त्यानें "नाहीं" असें उत्तर दिलें. तावडतोब पहिल्या रांकेंतील एक बँकर उठून त्याला उद्देशून मागें वळून म्हणाला, "मला ऐकूं येत आहे. मी तुमची जागा घेऊन तुम्हांला माझी जागा द्यायला तयार आहे."

## कै. रा. ब. दादासाहेब शेंबेकर यांना आदरपूर्वक श्रद्धांजलि

[ लेखक : श्री. नी. ना. क्षीरसागर, मॅनेजिंग डायरेक्टर, दि भारत इं. बँक लि. पुणें ]

महाराष्ट्रांतील प्रथितयश बागाईतदार व शेतकरी, कै. रा. ब. शेंबेकर यांची विविध क्षेत्रांतील सेवा सर्वश्रुतच आहे. औद्योगिक व व्यापारविषयक क्षेत्रांतील त्यांचे सांनिध्याचा लाभ ज्या ज्या कंपन्यांना झाला त्या त्या त्यांच्या सेवाकारकीर्दीत त्यांचें विशेष व्यक्तिमत्व दृग्गोचर होणारे अनेक प्रसंग संकलित करतां येण्यासारखे आहेत. आमच्या बँकेच्या बारामती शाखेचे सुरवातीपासून ते सल्लागार मंडळाचे अध्यक्ष या नात्यानें काम पाहात



होते. या कालावधींत त्यांच्या थोर व्यक्तित्वाचे निदर्शक म्हणून खालील सद्गुण प्रस्तुत लेखकाचे अनुभवास आले.

**१ खात्री पटतांच आपलें होत :**

आमच्या बँकेची बारामती येथें शाखा घ्यावी अशी वाटाघाट १९४३ चे सप्टेंबर महिन्यांत सुरू झाली. बारामती येथील स्थानिक माहिती मिळविण्याचे दृष्टीनें व शाखेस तेथील व्यापारी वर्गाचा पाठिंबा कितपत मिळूं शकेल याचा अंदाज घेण्याचे हेतूनें बारामती येथील ज्या कांहीं ठळक व्यक्तींच्या गांठीभेटी घेतल्या, त्यांत कै. दादासाहेब यांची भेट महत्त्वपूर्ण होय. स्थानिक व्यापारी मंडळींशीं विचारविनिमय करीत असतांना सर्वांचेकडून एकच सूचना येई कीं, कै. दादासाहेब यांची तुम्हांस मदत व पाठिंबा मिळाला तरच तुमच्या बँकेस येथें स्थान मिळूं शकेल. पूर्वी इतर कांहीं बँकांनीं आपली शाखा काढण्यासंबंधीं प्राथमिक चौकशी केली असतां येथें बँकेस विशेष वाव नाहीं असें कै. दादासाहेब यांचें मत प्रसृत झालेलें होतें. शिवाय बाहेरील एखादी बँक बारामती येथें येण्यापेक्षा स्थानिक मंडळींनीं एकत्र येऊन एक बँक काढावी असेंहि त्यांचें मत प्रसृत होतें. अशा मनोभूमिकेंतहि यांचे प्रथम भेटींत जी २॥–३ तास साधकबाधक चर्चा झाली, त्या चर्चेत आम्हीं आमचा दृष्टिकोन त्यांना पटवूं शकलों व त्यांनीं आम्हांस शाखेस सर्वतोपरी साहाय्य देण्याचें कबूल केलें इतकेंच नव्हे तर स्थानिक सल्लागार मंडळाचे अध्यक्षपदाची जबाबदारीहि पत्करली व अखेरपर्यंत तें काम 'आपली बँक' या दृष्टीनें सतत करीत आले होते.

**२ कार्यप्रवृत्त करण्याची हातोटी :**

बारामती येथील प्रसिद्ध नगरशेट कै. रंगीलदास नारायणदास ऊर्फ रंगुशेट यांचा बारामती भागांत मोठा सावकारी व्यवहार होता व हल्लींहि त्यांचे चिरंजीव तोच व्यवसाय पुढें चालवीत आहेत. बारामतीस सहकारी बँकेची शाखा सुमारें वीस वर्षें असूनसुद्धां शेटजींनीं त्या बँकेत कधीं खातें ठेविलें नव्हतें. जुन्या संस्कारानें म्हणा अथवा बँकांचें व्यवहारावरील कमी विश्वासानें, ते बँकेशीं संबंध ठेवण्यास तयार नसत असें सर्वांस माहीत होतें. सल्लागार–मंडळाचे एका सभेच्या वेळीं बारामती शाखेचा प्रगतीपर अहवाल सादर करीत असतांना कै. दादासाहेब यांनीं कै. रंगुशेट यांचेसंबंधीं उल्लेख करून ते म्हणाले " हे पाहा भाऊसाहेब, तुम्हीं आम्हां सर्वांना बँकेची उपयुक्तता व खात्री पटविलीत. आतां रंगुशेट यांची खात्री पटवून त्यांचें खातें जर बँकेंत तुम्हीं आणलेत तर तुम्हीं बारामतींत खरें कार्य केलेंत असें मी म्हणेन." रावबहादुरांच्या या सदिच्छेची पूर्तता आपणांस करतां येईल किंवा नाहीं याबद्दल मला जबरदस्त शंकाच होती. तथापि सुमारें पंधरा दिवसांचे अवधींतच नुसतें खातेंच नव्हे तर 'एक लाख' रुपयांची कायम ठेवहि बँकेस मिळविली! हें त्यांना समजल्यावर त्यांनीं मला बोलावून नेऊन माझें अभिनंदन व कौतुक केलें. कै. रंगुशेट यांनीं एक रकमी एक लाख रुपये बँकेंत ठेव ठेविल्याची माहिती त्यांनींच प्रसृत केली व या त्यांचे प्रचारामुळें आमचा बँकेवरील विश्वास द्विगुणित झाला.

**३ मनाचा थोरपणा :**

बँकेच्या इमारतीस लक्ष्मीरोडवर प्रमुख ठिकाणीं जागा मिळाल्यास ती खरेदी करावी असा आदेश मा. बोर्डानें १९४५ सालीं दिला होता. त्यास अनुसरून लक्ष्मीरोड ९३/२ बुधवार पेठ–हल्लींच्या बँकेच्या इमारतीची जागा व त्याचे शेजारील जागा–या सर्व जागेचे ( ८०′ × १००′ ) साठेखत रु. एक लक्ष सव्वीस हजारांस सदर मिळकत विकत घेण्याचे दृष्टीनें बँकेनें केलें. तथापि, सव्वा लाखाची जागा व इमारतीस बांधकामास लागणारी रक्कम सुमारें ४ लाख एवढी रक्कम बँकेनें त्यावेळचे परिस्थितीनुरूप गुंतविणें श्रेयस्कर होणार नाहीं अशा विचारसरणींत–या जागेपैकी ४०′ × १००′ निम्मी जागा दुसरे कोणास तरी द्यावी व निम्मी बँकेनें ठेवावी अशी कल्पना निघाली. ही कल्पना मूर्त स्वरूपांत येण्याचे अवधींत साठेखताच्या मुदतीचाहि प्रश्न प्रमुख होता. अशा या दुहेरी अडचणींत बँकेनें महत्प्रयासानें मिळविलेली महत्त्वाचे ठिकाणावरील जागा हातची घालविण्याचा प्रसंग येतो किंवा काय अशी साधार भीति वाटत होती. कै दादासाहेब यांना ही परिस्थिति सांगतांच ते निम्मी जागा विकत घेण्यास तयार झाले व तशी लेखी संमति त्यांनीं बँकेकडे दिली. या त्यांच्या संमतीनें बँकेस आपला हल्लींच्या जागेचा व्यवहार पुरा पाडतां आला. बाकीच्या निम्म्या भागाच्या खरेदीस कांहीं कायदेशीर अडचणी निर्माण झाल्यामुळें कै. रा. ब. शेंबेकरांचा व्यवहार मात्र पुरा होऊं शकला नाहीं! या घटनेमुळें बँकेचे व त्यांचे संबंधांत थोडीशी कटुता निर्माण होईल किंवा काय असें वाटत होतें; तथापि त्यांनीं आपल्या थोर मनानें सर्व गोष्टींचा विसर पाडून बँकेच्या इमारतीचे 'वास्तुशांती' समारंभास जातीनें हजर राहून बँकेचें अभिष्टचिंतन केलें.

**४ मनाची तळमळ :**

बारामती भागांत जे सहकारी पद्धतीवर कारखाने निघावयाचे आहेत त्यापैकी मालेगांव शुगर फॅक्टरीचे अध्यक्ष म्हणून कै. दादासाहेबांची नियुक्ति झालेली होती. या कारखान्याच्या पूर्वतयारीची तळमळ त्यांना सारखी लागून राहिली होती. चालू वर्षीं गुळाचे भावाचे मंदीमुळें शेतकरीवर्गाचे हातांत वेताचाच पैसा असल्यानें कारखान्यास रकमा जमा होण्यास कालावधी लागणें अपरिहार्य होतें व आठ लाखांची रक्कम डिपॉझिट म्हणून भरावयासहि अवधी अगदीं थोडा उरला होता. तथापि, नियोजित तारखेस ८–८–५५ रोजीं ठराविक रक्कम भरावयाचीच अशा निर्धारानें स्वतः जबाबदारी पत्करून कमी पडणाऱ्या रकमेची

पूर्तता कै. दादासाहेबांनीं आमचे बँकेमार्फत केली व ठराविक रकम नियोजित तारखेला भरली. मिळालेल्या थोड्या वेळांत व कारखान्याचे आणीबाणीचे वेळीं 'आपल्या बँकेनें' साहाय्य दिलें याबद्दल कै. दादासाहेबांनीं कारखान्याचे अध्यक्ष या नात्यानें बँकेचे आभार मानले आहेत.

कै. दादासाहेब यांचे आत्म्यास परमेश्वरानें चिरंतन शांति द्यावी अशी प्रार्थना करून ही 'श्रद्धांजलि' पुरी करतों.

## शेतकी उत्पादनाचा निर्देशांक

मध्यवर्ती अन्न व शेतकी खात्याच्या अर्थ आणि आंकडेवारी विभागानें सादर केलेल्या आंकडेवारीवरून भारताचा १९५४–५५ मधील शेतकी उत्पादनाचा निर्देशांक (मूळ प्रमाण: १९४९–५० मधील उत्पादनाचा निर्देशांक = १०० धरून) ११३·९ वर आल्याचें दिसून येतें. १९५३–५४ चा निर्देशांक ११४·१ होता. यावरून १९५४–५५ चा निर्देशांक १९५३–५४ पेक्षा किंचित् खाली आला आहे.

बिहार व पश्चिम बंगाल राज्यांच्या उत्तर जिल्ह्यांतील महापुरामुळें आणि तदनंतर उत्तर प्रदेश, आसाम, ओरिसा, इ. राज्यांतील अवर्षणामुळें खरीप हंगामांतील अन्नपिकांच्या उत्पादनांत घट झाल्यानेंच मुख्यतः या वर्षीच्या निर्देशांकांत घट झाली आहे. तथापि, रबी हंगामांतील तांदूळ व इतर पिकांचें उत्पादन १९५३–५४ पेक्षा बरेंच वाढल्यानें ही घट बऱ्याच अंशीं भरून आली.

निरनिराळ्या पिकांच्या उत्पादनाचा तपशील पुढीलप्रमाणें आहे:—

| | १९४९–५० | १९५३–५४ | १९५४–५५ |
|---|---|---|---|
| अन्नधान्यें— | | | |
| खरीप | १०० | ११९·१ | १०८·७ |
| रबी | १०० | १२०·४ | १२७·७ |
| एकूण | १०० | ११९·३ | ११२·१ |
| डाळी | १०० | ११२·१ | ११३·० |
| गळितधान्यें | १०० | १०६·७ | ११५·१ |
| कपासी, ताग वगैरे | १०० | १३३·५ | १४६·४ |
| मळे | १०० | १०२·६ | १०६·४ |
| इतर | १०० | ९७·१ | ११२·७ |
| एकूण | १०० | ११४·१ | ११३·९ |

**चीनला रशिआकडून 'रीॲक्टर' मिळणार**—अणुशक्ति निर्माण करण्याचा ६,५०० किलोवॅट शक्तीचा 'रीॲक्टर' रशिआ चीनला देणार आहे. त्याचा उपयोग प्रयोग करण्यासाठी होईल. पूर्व युरोपांतील देशांनाहि २,००० किलोवॅट शक्तीचा एक एक 'रीॲक्टर' रशिया देणार आहे. त्याशिवाय ह्या देशांना 'सायक्लोट्रॉन' हें यंत्रहि पुरविण्यांत येणार आहे.

**वलसाड म्युनिसिपालिटीचा कर**—वलसाड म्युनिसिपालिटीनें मालमत्तेवरील कर वसविण्यासाठी आपल्या हद्दींतील मालमत्तेची करपात्र किंमत नव्यानें ठरविली आहे. नव्या आकारणीमुळें १९५४–५५ सालापेक्षा १९५५–५६ सालांत १३·२ टक्के अधिक कर गोळा केला जाईल.

**म्हैसूर विद्यापीठाला मदत**—म्हैसूर विद्यापीठांतील प्राध्यापक व इतर शिक्षकवर्गाला मध्यवर्ती सरकारनें ठरविल्याप्रमाणें वेतन देण्यासाठी जो अधिक खर्च येईल त्यापैकी ८० टक्के खर्च देण्याचें युनिव्हर्सिटी ग्रँट्स् कमिशननें ठरविलें आहे.

## ॲग्रिकल्चरल वेअरहाउसिंग कॉर्पोरेशनची स्थापना

शेतमालासाठी सहकारी तत्त्वावर कर्ज पुरवठा, खरेदीविक्री, सांठवणीसाठी गुदामांची सोय व शेतमालाची साफसुफी यांचा विकास साधण्यासाठी संसदेच्या चालू अधिवेशनांत एक व्यापक स्वरूपाचें विधेयक मांडण्यांत यावयाचें आहे.

सदर विधेयक मध्यवर्ती अन्न व शेतकी खात्यानें तयार केलें असून त्यांत केंद्रस्थानीं राष्ट्रीय सहकारी विकास व गुदामव्यवस्था मंडळाची (नॅशनल को-ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट ॲन्ड वेअरहाऊसिंग बोर्ड) स्थापना करण्याची तरतूद आहे. सदर योजनेच्या आंतर-संबंधित बाबींवर या मंडळाची देखरेख राहील. या योजनेंत खरेदीविक्री, सांठवणीसाठी गुदामांची व्यवस्था, मालाची साफसुफी, इत्यादि प्रक्रिया यासुद्धां आर्थिक विकासाच्या सर्व अंगांचा व्यवहार सहकारी तत्त्वावर चालविण्याचा अंतर्भाव होतो.

मध्यवर्ती अन्न व शेतकी खात्याचे मंत्री व चिटणीस हे या मंडळाचे अनुक्रमें पदसिद्ध अध्यक्ष व उपाध्यक्ष राहतील व त्यावर संबंधित खात्यांचे व रिझर्व्ह बँकेचे, तसेच संसदेचे व इतर बिनसरकारी प्रतिनिधी घेण्यांत येतील. याशिवाय एक अर्थशास्त्रज्ञ व सहकारी क्षेत्रांतील चौघेजण यांनाहि या मंडळांत घेण्यांत येईल.

गुदामांची व खरेदीविक्रीची व्यवस्था करण्यास उत्तेजन देण्याच्या हेतूनें या विधेयकांत ऑल इंडिया वेअरहाउसिंग कॉर्पोरेशनची स्थापना करण्याची तरतूद करण्यांत आली आहे. या कॉर्पोरेशनचें अधिकृत भांडवल वीस कोटी रुपयांचें राहील. सरकार, रिझर्व्ह बँक, राज्य सरकारें, सहकारी संस्था, इत्यादींना त्याचे भाग विकत घेतां येतील.

या कॉर्पोरेशनमार्फत महत्त्वाच्या बाजारपेठांच्या ठिकाणीं मध्यवर्ती गुदामें सुरू करण्यांत येतील. शेतकरी अगर त्यांच्या सहकारी संस्था यांना माफक भाडें देऊन तेथें आपला माल सांठवून ठेवतां येईल. या मालाबद्दल गुदामांकडून मिळालेल्या पावतीच्या तारणावर त्यांना बँकांकडून कर्ज मिळण्याची सोय होईल.

या मध्यवर्ती कॉर्पोरेशनच्या जोडीस 'अ' आणि 'ब' विभागीय राज्यें वेअरहाउसिंग कॉर्पोरेशनें स्थापन करतील व त्या कॉर्पोरेशनांमार्फत महत्त्वाच्या बाजारपेठांच्या ठिकाणीं गुदामें उघडण्यांत येतील. राज्यांच्या अशा कॉर्पोरेशनच्या भांडवलांत मध्यवर्ती कॉर्पोरेशन व संबंधित राज्य सरकार यांची समान रक्कम राहील.

सुरुवातीला पांच कोटी रुपये देऊन राष्ट्रीय सहकारी विकास व गुदामविषयक व्यवस्था निधि उभारण्याची व नंतर त्यांत प्रतिवर्षी किमान ५ कोटी रुपये देण्याची तरतूद या विधेयकांत करण्यांत आली आहे. या निधीचा विनिमय मंडळास करतां येईल. मध्यवर्ती व राज्यांच्या वेअरहाउसिंग कॉर्पोरेशनांच्या कामकाजास हें मंडळ मार्गदर्शन करील.

सदर विधेयकामुळें सहकारी विकासाची गती वाढेल अशी अपेक्षा आहे. धान्यादि शेतमाल फार दिवस जवळ ठेवून थांबण्यासारखें नसल्यामुळें, शेतकरीवर्ग तो माल कापणीनंतर लागलीच कमी दरानेंहि विकून टाकीत असतो. या मंडळामुळें आतां या गोष्टीस बराच आळा बसेल, असा अंदाज आहे.

गळितधान्य गाळण्याचा धंदा, सरकी काढण्याचा धंदा, इत्यादि प्रक्रिया करणाऱ्या धंद्यांच्या वाढीसहि या विधेयकामुळें चालना मिळेल, असा अंदाज आहे.

## आयुर्विम्याची जॉइंट लाइफ योजना

### संयुक्त आणि व्यक्तिशः जबाबदारीचें तत्त्व

( नागपूर हायकोर्टाचा निवाडा )

**वामन गणेश वि० वेस्टर्न इंडिया लाईफ इन्शुअरन्स कं.**

वामन आणि रामचंद्र वर्तक ह्या नांवाचे इसम नागपूरला भागीदारींत धंदा करीत होते. त्यांनीं वेस्टर्न इंडिया लाईफ इन्शुअरन्स कं. ला १०,००० रुपयांचा विमा प्रत्येकीं काढण्याबाबत ता. २६ नोव्हेंबर १९३८ ला 'प्रपोजल' दिलें. 'जाईंट लाईफ प्लान' काढण्याबाबत त्यांचा विमा असून दोघांपैकी एक मरण पावल्यास दुसऱ्याला २०,००० रुपये मिळावेत अशी ती योजना होती. वरील विमा कंपनीनें दोघांचाहि विमा मंजूर करून त्यांना प्रत्येकी १३ मे १९३९ ला दोन पॉलिसीज दिल्यात. त्यानंतर रामचंद्र वर्तक हा ता. २७–९–१९४० ला मरण पावला. त्याच्या मृत्यूनंतर वामन गणेश ह्यानें विम्यांतील ठरावाप्रमाणें विमा कंपनीला २०,००० रुपयांची मागणी केली. ती विमा कंपनीनें नामंजूर केली. तेव्हां वामननें वेस्टर्न इंडिया लाईफ इन्शुरन्स कं. वर त्या रुपयांबाबत एक दावा लावला. वामनच्या दावेअर्जातील हकीकतीला विमाकंपनीनें हरकत घेतली आणि दाव्यांतील रुपयांची मागणी नामंजूर केली. त्यावर अव्वल कोर्टानेंहि विमा कंपनीचें म्हणणें मंजूर करून वामनचा दावा खारीज केला.

अव्वल कोर्टाच्या निर्णयावर वामननें हायकोर्टांत हें अपील दाखल केलें आहे. प्रस्तुतच्या अपिलींत वामनला विमा कंपनीवर डिक्री मिळूं शकते कीं काय हें आपल्याला पहावयाचें आहे. विमा कंपनींतील पॉलिसीप्रमाणें वामनला विमा कंपनीवर डिक्री मिळाली पाहिजे. विमा कंपनी ही पॉलिसीची रक्कम द्यावयाला जबाबदार आहे असा वामनतर्फे युक्तिवाद करण्यांत आला आहे. उलटपक्षीं, प्रपोजल फॉर्ममध्यें प्रकृतीविषयीं आणि मागील आजारपणाविषयीं जी माहिती वर्तकनें लिहिली ती बुद्धिपुरस्सर फसवणुकीची आणि खोटी आहे. मेडिकल ऑफिसरसमोरहि त्यानें खोटें बयान दिलें होतें. वर्तकानें बुद्धिपुरस्सर खोटी आणि फसवणुकीची माहिती दिल्यामुळें विमा कंपनी ही विम्याच्या कराराबाबत बंधनकारक राहत नाहीं, असा विमाकंपनीतर्फे युक्तिवाद करण्यांत आला आहे.

प्रस्तुतच्या केसमध्यें संयुक्त आणि व्यक्तिशः ( joint and several ) जबाबदारीचें तत्त्व लागूं पडतें. वामनतर्फे पुन्हां असेंहि सांगण्यांत आलें आहे कीं, त्यांच्या पॉलिसीज वेगवेगळ्या असल्यामुळें दुसऱ्यानें केलेल्या बयानाबाबत वामनला कराराखाली बंधनकारक ठरविलें जाऊं नये. रामचंद्रानें भरलेला प्रपोजल-फॉर्म हा त्याच्या माहितीप्रमाणें खोटा होता आणि बयान खरें असण्याबाबत करार झाला होता हें केसमध्यें सिद्ध झालेलें नाहीं. जेव्हां करार हा संयुक्त आणि विभक्त जबाबदारीबाबत असतो त्यावेळीं एकानें केलेलें बयान दुसऱ्याला बंधनकारक असतें. उभयपक्षांत झालेल्या दस्तऐवजावरून त्याचें उद्दिष्ट ठरवावयाचें असतें. प्रस्तुतच्या केसमध्यें वामन आणि रामचंद्र हे दोघेहि भागीदार असून त्यांच्या हिताला धरून दोन्हींहि पॉलिसीज तितक्याच महत्त्वाच्या होत्या. प्रत्येक पॉलिसीमध्यें प्रत्येकाची जबाबदारी ही संयुक्त होती. प्रपोजल फॉर्ममधील जी माहिती वर्तकनें खोटी लिहिली होती ती ह्याप्रमाणें होती. ७. "तुम्हांला मागील ५ वर्षांत कोणताहि जोरदार आजार, रोग किंवा ॲक्सीडेंट झाला होता काय ? तसें असल्यास त्याची तारीख आणि तपशीलवार माहिती द्यावी ? नाहीं. ८ अ. तुमच्या प्रकृतीचें मान सर्वसाधारणपणें कसें आहे ?—उत्तम" प्रपोजल फॉर्ममधील दिलेल्या माहितीप्रमाणेंच मेडिकल ऑफिससमोरहि वर्तकनें प्रकृति चांगली असून मागील पांच वर्षांत कोणताहि आजार झाला नाहीं अशी माहिती दिली आहे.

वर्तकच्या प्रकृतीविषयीं प्रस्तुतच्या केसमध्यें साक्षीदारानें पुढीलप्रमाणें पुरावा दिलेला आहे. श्री. के. टी. खरे हे वर्तकच्या पत्नीच्या बहिणीचे पति असून एम्. ए. वर्तक हे सख्खे बंधु आहेत. सन १९३८ मध्यें वर्तक हे मुंबईला गेले होते आणि तेथून ते पुण्याला डॉ. भडकमकरची प्रकृतिबाबत सल्ला घेण्यासाठीं गेले होते. डॉ. भडकमकर हे पुण्यांतील सुप्रसिद्ध डॉक्टर आहेत. तेथून वर्तक रत्नागिरीमधील मुरूड ह्या गांवीं हवा बदलण्याला गेलेत. श्री. के. टी. खरेनी वर्तकला अर्धांगवायु आणि हृदय–विकार असल्याचें सांगितलें. त्याचप्रमाणें एम्. ए. वर्तकनीं वर्तक हे नीट चालूं शकत नव्हते अशी साक्ष दिली आहे. वर्तक हे नागपूरला डॉ. दप्तरी आणि परांजपे ह्यांच्या औषधोपचाराखालीं होते. डॉ. परांजपेनीं त्यांना १९३७ च्या मध्यांत तीन महिनेपर्यंत औषधोपचार केला असून मयताला 'किडने डिसीज', 'लिव्हर एन्लार्जमेंट' आदि रोग झाले होते असा पुरावा दिला आहे. वर्तकाच्या मृत्यूच्या वेळीं डॉ. पटवर्धनचें औषध सुरू होतें आणि त्यांनीं आपल्या साक्षींत असें सांगितलें आहे कीं, वर्तक हे 'मायकार्डिअल डिजनरेशन' आणि 'हार्ट फेल्युअरनें मरण पावलेत.' वरील साक्षीदारांच्या पुराव्यावरून हें दिसून येतें कीं, वर्तक हे १९३७ च्या मध्यापासून सतत रोगानें पीडित असून त्याची त्यांना पूर्णपणें जाणीव होती. रोगाचा जोर वाढून असेर त्यांचा १९३८ मध्यें अंत झाला.

प्रस्तुतच्या केसमधील पुराव्यावरून हें सिद्ध होतें कीं, विमा काढण्यापूर्वी त्यांना रोगाची माहिती असून त्यांनीं ती 'प्रपोजल-फॉर्म' मध्यें लिहिली नाहीं. वामन आणि रामचंद्र हे भागिदारींत व्यापार करीत होते. सन १९३७ मध्यें वर्तक हे रोगानें पीडित झाल्यानंतरहि परस्परांना भेटण्याचे आणि बोलण्याचे प्रसंग भागीदारांत आले होते, तेव्हां वर्तकच्या प्रकृतीबाबत वामनला माहिती नाहीं असें म्हणतां येत नाहीं. विम्याच्या करारामध्यें प्रपोजल फॉर्ममध्यें जी माहिती लिहिली जाते आणि मेडिकल ऑफिसरसमोर जें सांगितलें जातें तें महत्त्वाचें असतें. ती माहिती हा त्यांच्यांतील कराराचा पाया होय. ती माहिती खोटी आणि फसवणुकीची दिली तर विम्याच्या कराराची अंमलबजावणी करतां येत नाहीं. त्यामुळें उभयपक्षांतील करार अस्तित्वांत राहत नाहीं. प्रस्तुतच्या केसमध्यें वर्तकला माहिती असून त्यानें खोटी माहिती विमा कंपनीला दिली आणि ती करारांतील महत्त्वाच्या अंगाबाबत होती असें आम्हीं ठरवितों. सबब वेस्टर्न इंडिया लाईफ इन्शुरन्स कं. पासून वामनला दाव्यांतील विम्याबाबत रुपयाची डिक्री मिळूं शकत नाहीं.

वरील कारणांस्तव वामननें दाखल केलेलें अपील आम्ही फेटाळून लावतों. अपील नामंजूर

**सारांश**—कोणत्याहि विमा कंपनींत विमा काढतांना विमा काढणाऱ्यानें 'प्रपोजल फॉर्म' मध्यें खरी माहिती द्यावयाला पाहिजे. प्रपोजल फॉर्ममध्यें खरी माहिती भरल्यावर डॉक्टराच्या परीक्षेंतहि त्यानें प्रकृतीबद्दल खरी माहिती दिली पाहिजे. विमा काढणाऱ्यानें ती माहिती खोटी दिली असें केसमध्यें सिद्ध झाल्यास आणि तो मरण पावल्यामुळें त्याच्या विम्याच्या रकमेची मागणी केली गेल्यास ती देण्याला विमा कंपनी जबाबदार राहणार नाहीं असें ठरविलें जाईल. —"न्यायबोध", ऑगस्ट १९५५

## गेल्या पांच वर्षांत एकरीं सरासरी उत्पादनांत वाढ

गेल्या जूनमध्यें संपलेलें १९५४–५५ हें शेतकी वर्ष जमेस धरून, गेल्या पांच वर्षांत भारतांतील अन्नपिकांखालील क्षेत्रफळ व उत्पादन यांत १९४९–५० पेक्षा वाढ झाल्याचें दिसून येतें. १९४९–५० हें वर्ष पहिल्या पंचवार्षिक योजनेचें मूळ वर्ष धरण्यांत येतें. तसेंच या काळांत एकरीं सरासरी उत्पादनांतहि बरीच वाढ झाली आहे.

१९५४–५५ या वर्षांत अन्नपिकांचें एकूण उत्पादन ५५·३ दशलक्ष टन म्हणजे १९४९–५० पेक्षा ९·३ दशलक्ष टनांनीं जास्त आहे. या वर्षांत अन्नपिकांखालीं २०९ दशलक्ष एकर जमीन होती. १९५०–५१ चा हा आंकडा १९३·६ दशलक्ष एकर असा होता. यावरून या वर्षांत लागवडीच्या क्षेत्रांत ६·९ टक्के व उत्पादनांत जवळजवळ २०·२ टक्के वाढ झाल्याचें दिसून येतें.

१९५४–५५ मधील अन्नधान्याचें उत्पादन पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या चौथ्या वर्षांतील या लक्ष्यापेक्षा जास्त झालें इतकेंच नव्हे तर १९५५–५६ करितां ठेवलेल्या लक्ष्यापेक्षाहि २८ लक्ष टनांनीं जास्त झालें आहे. तसेंच, या वर्षांतील अन्नपिकांखालील क्षेत्रफळहि पंचवार्षिक योजने अखेरसाठीं ठरलेल्या लक्ष्यापेक्षा १ कोटी १० लक्ष एकरांनीं अधिक आहे. परंतु या वर्षांतील लागवडींचें क्षेत्रफळ व उत्पादन १९५३–५४या विक्रमी वर्षापेक्षा कमी आहे. त्या वर्षाचे आंकडे, लागवडीचें क्षेत्रफळ २१५ दशलक्ष एकर व उत्पादन ५७·९ दशलक्ष टन असे आहेत.

निरनिराळ्या पिकांचा विचार करतांना या वर्षांत गव्हाच्या उत्पादनानें ( ८·५ दशलक्ष टन ) उच्चांक गांठल्याचें दिसून येतें. हा आंकडा १९५५–५६ च्या लक्ष्यापेक्षा सुमारें २० लक्ष टनांनीं जास्त आहे. त्याचप्रमाणें, ज्वारी व बाजरी व इतर अन्नधान्यें यांचें उत्पादन या वर्षी २२·६ दशलक्ष टन म्हणजे १९५५–५६ च्या लक्ष्यापेक्षाहि ५६ लाख टनांनीं अधिक आहे.

या वर्षी तांदळाचें उत्पादन २४·२ दशलक्ष टन, म्हणजे योजनेंतील चौथ्या वर्षाच्या अपेक्षित लक्ष्यापेक्षा २२ लाख टनांनीं कमी झालें. १९५३–५४ मधील उत्पादन २७·६ दशलक्ष टन होतें. परंतु मूळ वर्षाचा विचार करता १९५४–५५ मधील उत्पादन जवळ जवळ १० लाख टनांनीं अधिकच आहे.

बिहार आणि प. बंगाल राज्यांच्या उत्तरेकडील जिल्ह्यांतील मुसळधार पाऊस व पूर, तर दक्षिणेकडील जिल्ह्यांतील अवर्षण यामुळें प्रामुख्यानें ही घट झाली आहे. एकूण ३·४ दशलक्ष टन घटीपैकीं जवळ जवळ ३·१ दशलक्ष टन घट या दोन राज्यांतच झाली आहे.

१९५४–५५ मधील ५५·३ दशलक्ष टन उत्पादन व देशांतील ३७८ दशलक्ष लोकसंख्या यांचा हिशेब करतां दरडोई उत्पादनाचें प्रमाण १४·४ औंस म्हणजे पोषण सल्लागार समितीनें ठरवून दिलेल्या समतोल आहारापेक्षा ०·४ औंसानें जास्त आहे. तसेंच, हा आंकडा पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या मुदतीअखेर ठरविण्यांत आलेल्या १३·७ औंस या लक्ष्यापेक्षाहि जास्त आहे.

अन्नधान्यांच्या उत्पादनांत वाढ झाल्यानें धान्यआयातीचें प्रमाण कमी होऊन परकीय हुंडणावळीची बचत होण्यास मदत झाली आहे. भारतानें १९५१ मध्यें २१७ कोटी रुपयांच्या ४७ लाख टन धान्याची आयात केली होती, तर १९५४ मध्यें ४७ कोटी रु. च्या ८,०८,००० टन अन्नधान्याची आयात झाली. त्याशिवाय या वर्षांत ५१ लाख रु. च्या ७,००० टन तांदळाची निर्यात झाली. भारतानें १९५५ मध्यें ( जुलैपर्यंत ) केवळ ६,९०,००० टन धान्याची आयात केली आहे.

उत्पादनांतील वाढीस (विशेषत: एकरीं सरासरी उत्पादन) केवळ अनुकूल हवामान कारणीभूत आहे असें नव्हे. बिहार, प. बंगाल व उत्तर प्रदेश या राज्यांत १९५४ मध्यें आलेला महापूर तसेंच अवर्षण, यांचा विचार करतां देशांतील अन्नधान्यांच्या एकूण उत्पादनांत वाढ होण्यास पाणीपुरवठ्याच्या सोईंत सुधारणा, चांगल्या दर्जाच्या बियाण्यांचें वांटप, खतांचा वाढत्या प्रमाणावरील वापर आणि शेतीच्या सुधारलेल्या पद्धती, या गोष्टीहि कारणीभूत आहेत असें म्हणावयास पाहिजे.

अन्नपिकांच्या उत्पादनाचा तपशील पुढीलप्रमाणें आहे :—

**गेल्या पांच वर्षांतील अन्नपिकांची उत्पादन–वाढ**

**( आंकडे दशलक्ष टनांचे )**

| धान्याचा प्रकार | पंचवार्षिक योजनेच्या मूळ वर्षांतील उत्पादन (१९४९–५०) | प्रत्यक्ष उत्पादन | | १९५५–५६ चें नियोजित उत्पादन |
|---|---|---|---|---|
| | | १९५३–५४ | १९५४–५५ | |
| तांदूळ ... | २३·२ | २७·६ | २४·२ | २७·२ |
| गहूं ... | ६·३ | ७·९ | ८·५ | ८·३ |
| इतर धान्यें ... | १६·५ | २२·४ | २२·६ | १७·० |
| एकूण ... | ४६·० | ५७·९ | ५५·३ | ५२·५ |

## पावसाचें दुर्भिक्ष्य अगोदर कळूं शकेल काय ?

### डॉ. मॅन ह्यांची पहाणी

डॉ. मॅन ह्यांनीं ब्रिटिश अमदानींत हिंदी शेती व खेडीं ह्यांच्या संबंधांत केलेले प्रयत्न सुप्रसिद्ध आहेत. त्यांच्यामुळें कितीतरी हिंदी लोकांना त्यासंबंधांत संशोधन व कार्य करण्याची स्फूर्ति लाभलेली आहे. आतां, वयाच्या ८५ व्या वर्षीहि, त्यांनीं आपलें हें कार्य चालू ठेवलें आहे, त्याचें प्रत्यंतर म्हणजे " १८६५ ते १९३८ ह्या मुदतीमध्यें दख्खनमध्यें पडलेल्या पावसाची व दुष्काळांची पहाणी " हें त्यांचें प्रकाशन होय. डॉ. मॅन ह्यांना महाराष्ट्रांतील दुष्काळांचा प्रत्यक्ष अनुभव असल्याकारणानें त्यांनीं आपली बुद्धि व वेळ त्यासंबंधांत कांहीं उपाययोजना करतां येईल काय, ह्याकडे उपयोगांत आणली. " दुष्काळ निर्माण करील, असें पावसाचें दुर्भिक्ष्य अगोदर ओळखून त्याबाबत अंदाज वर्तविता येतील काय ? " ह्या प्रश्नाचें उत्तर त्यांना शोधून काढावयाचें होतें. तथापि, तें उत्तर त्यांना सांपडलेलें दिसत नाहीं. तरी पुष्कळच उपयुक्त माहिती त्यांना एकत्रित करतां आली आहे. डॉ. मॅन ह्यांच्या प्रस्तुत प्रकाशनामुळें अशाच कार्यास चालना मिळेल, तर फार बरें होईल.

( Rainfall and Famine : A study of Rainfall in the Bombay Deccan 1865 to 1938 पृ. सं. ४२, किं. २ रु.)

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९९५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४. येथें प्रसिद्ध केलें.